# ई - पोलीस पत्रिका

दिनांक १३/०१/२०२५ अनु.क्र. ०९/२५

**(अमरावती शहर पोलीसांची २०२५ ची उद्दिष्टे)**

- **नागरिकांशी मित्रत्वाचे संबध.**
- **उच्च मनोबल युक्त व तणाव मुक्त पोलीसदल.**
- **महीला, मुले व जेष्ठ नागरिकांचीसुरक्षा.**
- **जातीयसलोखा वाढविणे.**
- **संघटितगुन्हेगारी आणि आतंकवादी यांचे विरुध्द कठोर कारवाई.**
- **रस्त्यावरील गुन्हेगारीवर नियंत्रण/सुरक्षा.**
- **पोलीस कोठडीत गुन्हे घडु न देणे.**
- **आरोपी पोलीसांचे ताब्यातुन पळुन जाऊ नयेत.**
- **"सुरक्षित व सुखकर अमरावती" हा आमचा संकल्प आम्ही व्यापक लोकसहभागातुन साध्य करु.**

# भाग-१

## पदोन्नती/बदली/प्रशिक्षण/रजा

## बदली

**१.पोआअ/पशा-१/नेमणुक/आस्थापना मंडळ/१०४०३/२०२४ अमरावती शहर दिनांक ०३/०१/२०२४**

**वाचा :-** १) सन २०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ दिनांक २५.०६.२०१४
२) सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र ११ दिनांक ०६.०४.२०१५
३) महाराष्ट्र शासन गृह विभाग, शासन परिपत्रक क्रमां न्यायाप्र ३११५/प्र.क्र. ८८/पोल-३ दि. ०१.०७.२०१५
४) आयुक्तालय स्तरावरील पोलीस आस्थापना मंडळाचे दि. ०३.१२.२०२४ चे इतिवृत्त.

### आदेश

सन २०१५ च्या महाराष्ट्र अधिनियम क्र. ११ दिनांक ०६.०४.२०१५ मधील मुख्य अधिनियमाच्या (महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१) च्या कलम २२ न च्या पोट कलम (१) (क) मध्ये नमुद केलेल्या तरतुदी नुसार तसेच आयुक्तालयस्तरावरील पोलीस आस्थापना मंडळ यांना प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन अमरावती शहर या पोलीस घटकामधील खालील नमुद अधिकारीयांची प्रशासकीय कारणास्तव तात्पुरत्या स्वरुपात पुढील आदेशापर्यंत त्वरीत प्रभावानेत्यांचे नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी बदली करण्यात येत आहे.

| अ. क्र. | पोलीस अधिकारी यांचे नाव | पदनाम | सध्याचे नेमणुकीचे ठिकाण | बदलीचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्री कैलास मनोहर पुंडकर | सहायक पोलीस आयुक्त | नियंत्रण कक्ष, अमरावती शहर | सहायक पोलीस आयुक्त, फ्रेजरपुरा विभाग, अमरावती शहर |

## प्रशिक्षण

**१.पोआअ/पशा-१/प्रशि./CPR/Women Safety/२१/२०२५ अमरावती शहर दिनांक ०१/०१/२०२५**

**संदर्भ :-** अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके म. रा. मुंबई यांचे यांचे पत्र जा. क्र. पोमसं /प्रशि-२/आर्थिक गुन्ह्याचा तपास /६५/२०२४/१८७० दिनांक २०.१२.२०२४.

**विषय :-** वुमन सेफ्टी ( Women Safety) या विषयावर ०५ दिवसीय प्रशिक्षण सत्र क्र. ४ पोलीस संशोधन केंद्र, पुणे येथे आयोजित केल्याबाबत.

### आदेश

उपरोक्त संदर्भांकीत विषयान्वये, पोलीस संशोधन केद्र, पुणे येथे दि. 06.01.2025 ते 10.01.2025 या कालावधीमध्ये वुमन सेफ्टी (Women Safety) या विषयाचे प्रशिक्षण आयोजित करण्यात आलेले आहे. सदरचे प्रशिक्षणाकरीता अमरावती शहर पोलीस घटकातुन खालिल नमुद पोलीस अधिकारी यांची निवड करण्यात येत आहे.

| अ. क्र. | अधिका-याचे नांव | पदनाम | पोलीस घटकाचे नांव | सद्याची नेमणुक | मोबाईल क्र. |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | श्रीमती विद्या काळे | पोलीस उपनिरीक्षक | पो. आयुक्त, अमरावती शहर | पो. स्टे. राजापेठ | ८८०६२४८८७९ |
| ०२ | श्री. दिनेश सुरपाम | पोलीस उपनिरीक्षक | पो. आयुक्त, अमरावती शहर | पो. स्टे. गाडगेनगर | ७९७२१६९६५८ |

**प्रशिक्षण केंद्रात जाण्यापुर्वी त्या बाबतचे नियम व अटी खालील प्रमाणे :-**

१. प्रशिक्षणास साध्या कपड्यात (Plain Cloths) उपस्थित राहावे, प्रशिक्षण काळात जीन्स/टि-शर्ट परिधान करु नये.
२. सी.पी.आर. पुणे येथे लॉन टेनिस, स्विमींग पुल या सुविधा उपलब्ध असुन त्यांचा वापर करावयाचा असल्यास आवश्यक किट सोबत न्यावी.
३. प्रशिक्षणाकरीता फक्त प्रशिक्षणार्थीनी उपस्थित राहावे. सोबत पती/पत्नी किंवा लहान मुलांना घेवुन जावु नये. तसेच वाहनचालक/सुरक्षा सहायक यांची व्यवस्था केली जाणार नाही.
४. प्रशिक्षणार्थी अधिकारी यांनी दि. ०५/०१/२०२५ रोजी २१.०० वाजता प्रशिक्षण स्थळी पोहचावे.

## रजा

**१.पोआअ/पशा-१/रजा पोलीस अधिकारी/७४/२०२५ अमरावती शहर दिनांक ०२/०१/२०२५**

## आदेश

अमरावती शहर पोलीस घटकातील खालील नमुद पोलीस अधिकारी यांना त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या कालावधीत **अर्जित रजा, मुख्यालय सोडण्याची परवानगीसह मंजूर करण्यात** येत आहे.

| अ. क्र | पोलीस अधिकारी यांचे नाव व पदनाम | नेमणुकीचे ठिकाण/ पो. स्टे | रजेचा प्रकार | कालावधी | कार्यभार सांभाळणार |
|---|---|---|---|---|---|
| **०१** | श्री. शिवाजी बचाटे, सहायक पोलीस आयुक्त | गुन्हे विभाग, अति. कार्यभार- प्रशासन विभाग | **अर्जित रजा** | दि. ०८.०१.२०२५ ते २२.०१.२०२५ पर्यंत १५ दिवस | १) स. पो. आयुक्त, गुन्हे विभाग या पदाचा अतिरिक्त कार्यभार श्री. गोरखनाथ जाधव, पोनि, गुन्हे शाखा युनिट-१ यांचेकडे व |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | २) स. पो. आयुक्त प्रशासन विभाग या पदाचा अतिरिक्त कार्यभार - श्रीमती सिमा दाताळकर, पोलीस निरीक्षक, ATB यांचेकडे सोपविण्यात येत आहे. |

## भाग-२

## शिक्षा/निलंबन/पुन्हा स्थापना/बक्षिस/सेवानिवृत्त/मयत/नाव कमीकरण

## शिक्षा

**१.पोआअ/विचौ-२/कसुरी अहवाल/अंतिम आदेश/सपोनि-हिवाळे/१०७५३/२०२४ अमरावती शहर दिनांक १२/१२/२०२४**

**संदर्भ क्रमांक** :- १) पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-१, अमरावती शहर यांचे कडील जावक क्रमांक पोउपआ/परि-१/कसु.अहवाल/१२८०/२०२४, दिनांक ३१/०७/२०२४

२) या कार्यालयाची कारणे दाखवा नोटीस क्रमांक पोआअ/विचौ-२/कसुरी अहवाल/का.दा.नो./ सपोनि-हिवाळे/७७३६/२०२४,दिनांक २७/०८/२०२४

**कसुरदारचे नाव** :- श्री संदिप हिवाळे, सहायक पोलीस निरीक्षक, नेमणुकपोलीस स्टेशन बडनेरा, अम.शहर.

**थोडक्यात कसुरी :-**

तुम्ही श्री संदिप हिवाळे, सहायक पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन बडनेरा, अमरावती शहर येथे नेमणुकीस असुन तुम्हाला कडे ०१ वर्षावरील व ०६ महिन्यावरील प्रलंबित गुन्हयांचे कागदपत्र घेवुन पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-१ यांनी त्यांचे कार्यालयात दि.३१/०७/२०२४ रोजी बोलावले असता. तुम्ही पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-१, अमरावती शहर यांचे कार्यालयात दि.३१/०७/२०२४ रोजी उपस्थित राहुन तुमच्या कडे पो.स्टे.बडनेरा येथील तपासावर प्रलंबित असलेल्या चार गुन्हयांचे कागदपत्र पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-१ यांचे समक्ष सादर केले ते गुन्हे खालील प्रमाणे आहेत.

तसेच उपरोक्त गुन्हयांच्या तपासाच्या कागदपत्राची पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-१ यांनी पडताळणी केली असता सध्याचे तपासी अधिकारी तुमच्या कडे गुन्हे पुढील तपास कामी मिळाल्यांनतर तुम्ही गुन्हयांचा पुढील तपास काहीही केलेला नाही व चारही गुन्हे विनाकारण प्रलंबित ठेवले आहे. तपासी अधिकारी तुमच्या कडे पुढील तपासाकरीता प्राप्त झालेल्या खालील नमुद गुन्हयांच्या तपासा कडे जाणीवपुर्वक दुर्लक्ष करुन वेळेत गुन्हयांची निर्गती केलेली नाही. तसेच अप क्र. २३८/२०२३ व अप क्र. ४९४/२०२३ या दोन गुन्हयांच्या केस डाय-या देखील लिहील्या नाहीत व केस डाय-याला पान क्रमांक दिलेले नाही, स्पायरल बाईडींग केल्या नसल्याचे आढळुन आले आहे. तुमचे कामकाज समाधानकारक नसल्याचे आढळुन आहे. तुमचे हे कृत्य

निष्काळजीपणाचे व बेजबाबदारपणाचे दिसुन आले असुन वरिष्ठ अधिकारी यांनी तुम्हाला दिलेल्या सुचनांकडे दुर्लक्ष केले आहे. तुमचे हे कृत्य निष्काळजीपणाचे व बेजबाबदारपणाचे असुन तुम्ही तुमच्या कर्तव्यात निष्काळजीपणा/बेजबाबदारपणा केला असुन कर्तव्यात कसुर केलेला आहे.

| अ. क्र. | अप क्र. | कलम | दाखल दिनांक | गुन्हयांची सध्यास्थिती |
|---|---|---|---|---|
| १ | २६८/२३ | ४२०, ४६५, ४६८, ४७१, ३४ भादवि | १२/०४/२३ | या गुन्हयांची तत्का.तपासी अधिकारी यांनी लिहीलेल्या केस डायरी क्र. २५, दि. ०२/०३/२०२४ नंतर सध्या तपासी अधिकारी यांना तपासा करीता कागदपत्र प्राप्त झाले पासुन एकही केस डायरी लिहीली नाही. |
| २ | ४९४/२३ | ३५४, ३२३, ५०४, ३४ भादवि | ०५/०७/२३ | या गुन्हयांच्या पुढील तपासाकरीता तपासाचे कागदपत्र प्राप्त झाले पासुन एकही केस डायरी लिहीली नाही आहे. |
| ३ | ६३२/२३ | ३५३, २९४, ५०४ भादवि | २७/०८/२३ | या गुन्हयांची केस डायरी क्र. ०४ ही दि.१३/०७/२०२४ लिहीली आहे, परंतु गुन्हयांचा काहीच तपास केलेला नाही. |
| ४ | ६३७/२३ | ३०५, ३२३, ५०४ भादवि | २९/०८/२३ | या गुन्हयांची केस डायरी क्र. ०३ ही दि.३०/०३/२०२४ लिहीली आहे, परंतु गुन्हयांचा काहीच तपास केलेला नाही. |

अशा प्रकारे तुम्ही उपरोक्त प्रकरणी कसुरी केल्याने तुमच्या या गैरवर्तन कसुरी बद्दल तुम्हास मुंबई पोलीस (शिक्षा व अपील) १९५६ नियम क्रमांक ३ (२) मधील (५) चे तरतुदी नुसार **पुढीलदेय वार्षीक वेतन वाढ एक (१) वर्षाकरीता (परिणाम न होता)** का रोखण्यात येवु नये ? म्हणुन कारणे दाखवा नोटीस देण्यात आली होती.सदर कारणे दाखवा नोटीस तुम्ही स्विकारली असुन त्यावर तुमचे स्पष्टीकरण सादर केलेले असुन तुम्हाला आमचे आज्ञांकित कक्षात तुमचे मौखीक म्हणणे मांडण्यासाठी या कार्यालयाचे बिनतारी संदेश क्रमांक पोआअ/विचौ-२/कसुरी/आज्ञांकित कक्ष/१००/२०२४, दिनांक ०४/१२/२०२४ अन्वये दिनांक ०५/१२/२०२४ रोजी समक्ष बोलावले असता तुम्ही आज्ञांकित कक्षात हजर झाले असुन आमचे समक्ष तुमचे मौखीक म्हणणे मांडले व स्पष्टीकरणाचे अवलोकन करुन तुम्हास पुढील कर्तव्यात कामामध्ये सुधारणा करण्याची एक संधी देण्यात येवुन प्रस्तावित कारणे दाखवा नोटीसमध्ये देण्यात आलेल्या शिक्षेमध्ये अंशत: बदल करुन खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## अंतिम आदेश

वर नमुद कसुरदार यांनाउपरोक्त कसुरीबाबत मुंबई पोलीस (शिक्षा व अपील) नियम १९५६ चे नियम क्रमांक ३ मधील उप-नियम (२) मधील (ii) चे तरतुदी नुसार **"सक्त ताकीद"**ही शिक्षा देण्यात येत आहे.

**२.पोआअ/विचौ-२/कसुरी अहवाल/अंतिम आदेश/पोउपनि-श्रीराव/१०८१७/२०२४ अमरावती शहर दिनांक १३/१२/२०२४**

**संदर्भ क्रमांक** :- १) पोलीस निरीक्षक, विशेष शाखा, अमरावती शहर यांचे कडील जावक क्रमांक ४०४१, ४०४२/२०२४, दिनांक २७/०६/२०२४
२) या कार्यालयाची कारणे दाखवा नोटीस क्रमांक पोआअ/विचौ-२/कसुरी अहवाल/ का.दा.नो./पोउपनि-श्रीराव/६९९२/२०२४,दिनांक ०२/०८/२०२४

**कसुरदारचे नाव** :- श्री निळकंठ श्रीराव, पोलीस उपनिरीक्षक, नेम. विशेष शाखा (सध्या नियंत्रण कक्ष), अम. शहर

**थोडक्यात कसुरी :-**

तुम्ही श्री निळकंठ श्रीराव, पोलीस उपनिरीक्षक, विशेष शाखा (सध्या नियंत्रण कक्ष), अमरावती शहर येथे नेमणुकीस असुन तुम्ही विशेष शाखा येथे नियुक्ती झाल्यापासुन आजपावेतो सोपविलेले एकही काम जबाबदारीने पुर्ण केलेले नाही. दिनांक १६/०५/२०२४ रोजी मा.विशेष पोलीस महानिरीक्षक (सागरी सुरक्षा व सुरक्षा), राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी अंतर्गत सुरक्षा योजना सन - २०२४ तात्काळ तयार करुन पाठविण्याबाबत कळविण्यात आलेले आहे. दिनांक १७/०५/२०२४ रोजी सदर अंतर्गत सुरक्षा योजना - २०२४ तात्काळ तयार करुन वरिष्ठ कार्यालयात सादर करणेबाबत व.पो.नि.अवचार यांनी तुम्हाला आदेशित केले होते. परंतु तुम्ही अद्याप पावेतो सदर योजना तयार केली नाही. सदर योजना तयार करण्याबाबत तुम्हाला वारंवार तोंडी आदेशित केले असता तुम्ही व.पो.नि. विशेष शाखा यांना ०२ दिवसात तयार करतो असे सांगितले असुन दिनांक २७/०६/२०२४ पावेतो एकुण ४२ दिवस संपुन सुध्दा तुम्ही आजपावेतो अंतर्गत सुरक्षा योजना - २०२४ तयार केलेली नाही.

तसेच तुम्हाला लोकसभा सार्वत्रिक निवडणुक - २०२४ करीता जि.नंदुरबार येथे दिनांक १०/०५/२०२४ चे सकाळी ०९.०० वा. बंदोबस्ताकरीता रवाना करण्यात आले होते. सदर बंदोबस्ताचे नोडल अधिकारी श्री हिवाळे, सपोनि राजापेठ यांना नेमण्यात आले होते. बंदोबस्त सपल्या नंतर आप आपल्या घटकात परत करण्यात आले असुन नियत्रंण कक्ष, अम.शहर येथे साना क्र. २७/२४, वेळ १४.०१ वा. दिनांक १५/०५/२०२४ नुसार हजर झाल्याबाबतची नोंद घेतली आहे. तुम्ही बंदोबस्तवरुन परत आल्या नंतर परस्पर गैरहजर असल्याचे दिसुन आले असुन दिनांक १६/०५/२०२४ रोजी नियत्रंण कक्ष, अम.शहर येथे साना क्र. ३१/२४, वेळ १६.४० वा. नुसार गैरहजर बाबत नोंद घेण्यात आली आहे. तुम्ही दिनांक १७/०५/२०२४ रोजी २१.०० वा. गैरहजर मधुन कर्तव्यावर हजर झाले आहेत. तरी दिनांक १६/०५/२०२४ ते दिनांक १७/०५/२०२४ चे २१.०० वा. पर्यत एकुण ०२ दिवस अनाधिकृतपणे गैरहजर राहिले असुन वरिष्ठांना कोणत्याही प्रकारची पुर्व सुचना न देता परस्पर गैरहजर राहिले. तुम्ही पोलीस खात्यासारख्या शिस्तीच्या दलामध्ये कर्तव्यावर असुन अशोभनीय असे वर्तन केले आहे. निष्काळजीपणा बेजबाबदारपणा केला असुन कर्तव्यात कसुर केलेला आहे.

अशा प्रकारे तुम्ही उपरोक्त दोन्ही कसुरी केल्याने तुमच्या या गैरवर्तन कसुरी बद्दल तुम्हास **मुंबई पोलीस (शिक्षा व अपील) १९५६ नियम क्रमांक ३ (२) (४) चे तरतुदी नुसार रु. ५०००/- (अक्षरी - पाच हजार रुपये फक्त) दंडाची शिक्षा का करण्यात येवु नये ?** म्हणुन कारणे दाखवा नोटीस देण्यात आली होती.सदर कारणे दाखवा नोटीस तुम्ही स्विकारली असुन त्यावर तुमचे स्पष्टीकरण सादर केलेले असुन तुम्हाला आमचे आज्ञांकित कक्षात तुमचे मौखीक म्हणणे मांडण्यासाठी या कार्यालयाचे बिनतारी संदेश क्रमांक पोआअ/विचौ-२/कसुरी/आज्ञांकित कक्ष/१००/२०२४, दिनांक ०५/१२/२०२४ अन्वये दिनांक ०६/१२/२०२४ रोजी समक्ष बोलावले असता तुम्ही

आज्ञांकित कक्षात हजर झाले नाही. तरी सादर केलेल्या स्पष्टीकरणाचे अवलोकन करुन तुम्हास पुढील कर्तव्यात कामामध्ये सुधारणा करण्याची एक संधी देण्यात येवुन प्रस्तावित कारणे दाखवा नोटीसमध्ये देण्यात आलेल्या शिक्षेमध्ये अंशत: बदल करुन खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## अंतिम आदेश

वर नमुद कसुरदार यांनाउपरोक्त कसुरीबाबत मुंबई पोलीस (शिक्षा व अपील) नियम १९५६ चे नियम क्रमांक ३ मधील उप-नियम (२) मधील (ii) चे तरतुदी नुसार **"सक्त ताकीद"**ही शिक्षा देण्यात येत आहे.

# भाग-३

## वेतन/संरचना/वेतन निश्चिती/वार्षीक वेतनवाढ/संकीर्ण

## संकीर्ण

**१.पोआअ/पशा-१/रोख सममुल्य/से.नि.पोउपनि/१७४/२०२४अमरावती शहर दिनांक ०७/०१/२०२५**

## आदेश

अमरावती शहर या पोलीस घटकातील खालील नमुद पोलीस अधिकारी हे नियत वयोमाााुसार शासकीय सेवेतुन सेवाावृत्त झाले आहेत. त्यांाा शासन निर्णय वित्त विभाग/अ.रजा-२४०१/८/सेवा-९, /दिनांक १५ जाोवारी २००१ मधील परि. क्र. २ (२) (एक) च्या तरतुदीुसार तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) ाियम १९८१ मधील ाियम क्र. ६८ (१) सुधारीत **शासन निर्णय वित्त विभाग अरजा-२०१९/प्र.क्र.१२/सेवा-६ दिनांक २४.०५.२०१९ अन्वये** च्या तरतुदीुसार सेवाावृत्तीचे तारखेस शिल्लक असलेल्या अंतिम अर्जित रजेचे रोखमुल्य मंजुर करण्यात येत आहे.

| अ. क्र. | सेवानिवृत्त पोलीस अधिकारी यांचे नाव | से.नि. तारीख | शिल्लक अर्जित रजा | ०७ वे वेतन आयोगानुसार शेवटचे वेता व वेतन स्तर |
|---|---|---|---|---|

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्री. सुनिल दयाराम खंडारे,<br>सेवानिवृत्त पोलीस उपनिरीक्षक,<br>अमरावती शहर | ३१/१२/२०२४ | ३०० | **५५१००/-<br>(S-१४)** |

१/- प्रमाणीत करण्यात येते की, अर्जित रजा लेखा हा कर्तव्य कालावधी पुरता गणण्यात आलेला असुन अर्जीत रजा शिल्लक रजेच्या अधिन राहुन जमा करण्यात आलेल्या आहे.

२/- सदरचा खर्च **२०७१/Pension of other Retirement Benefits ११५ Encashment of Leave** या लेशा शिर्षातुन भागविण्यात यावा.

**२.पोआअ/पशा-१/रोख सममुल्य/से.नि.पोउपनि/१७५/२०२४अमरावती शहर दिनांक ०७/०१/२०२५**

## आदेश

अमरावती शहर या पोलीस घटकातील खालील नमुद पोलीस अधिकारी हे नियत वयोमानानुसार शासकीय सेवेतुन सेवानिवृत्त झाले आहेत. त्यांना शासन निर्णय वित्त विभाग/अ.रजा-२४०१/८/सेवा-९, /दिनांक १५ जानेवारी २००१ मधील परि. क्र. २ (२) (एक) च्या तरतुदीनुसार तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ मधील नियम क्र. ६८ (१) सुधारीत **शासन निर्णय वित्त विभाग अरजा-२०१९/प्र.क्र.१२/सेवा-६ दिनांक २४.०५.२०१९ अन्वये** च्या तरतुदीनुसार सेवानिवृत्तीचे तारखेस शिल्लक असलेल्या अंतिम अर्जित रजेचे रोखमुल्य मंजुर करण्यात येत आहे.

| **अ.क** | **सेवानिवृत्त पोलीस अधिकारी यांचे नाव** | **से.नि. तारीख** | **शिल्लक अर्जित रजा** | **०७ वे वेतन आयोगानुसार शेवटचे वेतन व वेतन स्तर** |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्री. नितीन गंगाधरराव इसोकार,<br>सेवानिवृत्त पोलीस उपनिरीक्षक,<br>अमरावती शहर | ३१/१२/२०२४ | ३०० | **५५१००/-<br>(S-१४)** |

१/- प्रमाणीत करण्यात येते की, अर्जित रजा लेखा हा कर्तव्य कालावधी पुरता गणण्यात आलेला असुन अर्जित रजा, शिल्लक रजेच्या अधिन राहुन जमा करण्यात आलेल्या आहे.

२/- सदरचा खर्च **२०७१/ Pension of other Retirement Benefits ११५ Encashment of Leave** या लेशा शिर्षातुन भागविण्यात यावा.

**(गणेश शिंदे)**
पोलीस उपायुक्त (मुख्या.)
अमरावती शहर

प्रति,

पत्रव्यहार शाखा/सेवापट नोंदणी लिपीक/सीसीटीएनएस